Mirae Asset Knowledge Academy

गुंतवणूकदारांच्या माहितीसाठी



# म्युच्युअल फंडांबद्दल माहिती

## म्युच्युअल फंड म्हणजे काय?

साध्या शब्दांत सांगायचे तर, अनेक गुंतवणूकदारांनी एकत्रितपणे गुंतवलेल्या पैशांतून म्युच्युअल फंड तयार होतो. त्यानंतर या पैशांचे व्यवस्थापन व्यावसायिक निधि व्यवस्थापकाद्वारे केले जाते, जो त्याच्या गुंतवणूक व्यवस्थापन कौशल्यांचा उपयोग करून हे पैसे वेगवेगळ्या फायनान्शियल इंस्ट्रुमेंटस्‌मध्ये गुंतवतो.

एक गुंतवणूकदार म्हणून तुम्ही काही युनिटांचे मालक होता, जे एकूण निधीपैकी तुम्ही धारण केलेल्या भागाचे प्रतिनिधित्व करत असते व ते तुम्ही गुंतवलेल्या पैशांवर अवलंबून असते.

## १. एनएव्ही म्हणजे काय?

ज्याप्रमाणे भागाला (शेअरला) एक किंमत असते त्याप्रमाणे म्युच्युअल फंडाला एनएव्ही असते. सोप्या शब्दांत सांगायचे तर एनएव्ही एखाद्या निधीतील प्रत्येक युनिटचे बाजारमूल्य दर्शवते किंवा ज्या किंमतीला गुंतवणूकदार युनिटस्‌ विकत घेऊ शकतात किंवा विकू शकतात ते मूल्य दर्शवते. एनएव्हीचा हिशेब सामान्यपणे दररोज केला जातो, व तो कोणत्याही एखाद्या विशिष्ट दिवशी त्या निधिकडे असलेल्या शेअर्स, बाँडस्‌ आणि प्रतिभूतींचे (सेक्युरिटीजचे) चे एकत्रित बाजारमूल्य दर्शवतो (ज्याची किंमत अनुमतित खर्च आणि चार्जेस वजा जाता दाखवलेली असते).

ज्या योजनेत तुम्हाला पैसे गुंतवायचे आहेत त्याचे एनएव्ही १० आहे की १०० हे महत्त्वाचे नसते. जर त्या निधीने १ वर्षात १०% परतावा दिला तर एनएव्हीचे मूल्य ११ वर किंवा ११० वर जाईल, म्हणजेच दोन्ही बाबतीत सारखाचे परतावा मिळेल. त्यामुळेच कमी एनएव्हीवर लक्ष केंद्रित न करता त्या निधीच्या कार्यातील सातत्य तपासावे.

## २. वेगवेगळ्या प्रकारचे म्युच्युअल फंड कोणते आहेत?

तुम्हाला थोड्या काळासाठी पैसे गुंतवायचे आहेत की दीर्घ काळासाठी? तुमच्या गरजांनुसार निधी निवडण्यासाठी तुम्हाला उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या निधींबद्दल माहिती असणे आवश्यक आहे.

### i. डेट म्युच्युअल फंड

डेट म्युच्युअल फंडांचे काम कर्जांवर आधारीत असते. त्यामुळेच हे पाहूया की सामान्यत: जेव्हा एखादी व्यक्ती कर्ज घेते तेव्हा कोणत्या अटी घातल्या जातात?

- मुद्दल गुंतवणुकीची रक्कम परत मिळेल याबद्दल रास्त हमी.
- त्यातून मिळणारे व्याज जे व्याज दरावर आधारीत असेल (यालाच कूपन रेट असेही म्हटले जाते).
- मुद्दलाची रक्कम किती कालावधीनंतर परत मिळणार आहे तो कालावधी.

डेट फंडांमुळे तुमच्या गुंतवणुकीला स्थैर्य लाभते कारण इक्विटी फंडांच्या तुलनेत त्यांच्या बाबतीतील जोखीम कमी असते आणि तुमच्या मुद्दलाचे संरक्षण करीत असतानाच सातत्याने परतावे निर्माण करणे हे त्याचे उद्दिष्ट असते.

### ii. इक्विटी म्युच्युअल फंड

जेव्हा तुम्ही इक्विटीमध्ये गुंतवणूक करता, तेव्हा तुम्ही केलेल्या गुंतवणुकीच्या प्रमाणात तुम्हाला त्या कंपनीचे मालक समजले जाते . त्यामुळेच एखाद्या मालकाप्रमाणेच तुमचा नफा हा कंपनीच्या कार्याशी निगडीत असतो. जितका कंपनीचा नफा जास्त असेल तितकी शेअरची किंमत वाढेल आणि त्यामुळेच तुम्हाला मिळणारा फायदाही वाढेल.

इक्विटी फंडांच्या बाबतीत जोखीम जास्त असते परंतु त्यांच्यात अधिक जास्त परतावा किंवा उत्पन्न देण्याची क्षमताही असते. या जोखमीविरूद्ध संरक्षण देण्यासाठी म्युच्युअल फंडांचे पैसे अनेक कंपन्यांमध्ये गुंतवले जातात, ज्या सामान्यत: एकाच किंवा एकमेकांशी संबंधित विभागांमध्ये नसतात. यालाच डायवर्सिफाइंग म्हटले जाते व त्यामुळे एकूण जोखीम कमी होते.

### iii. लिक्विड म्युच्युअल फंड

वित्तीय भाषेत सांगायचे तर, लिक्विड या शब्दाचा अर्थ असा आहे की 'मला माझे पैसे किती जलद परत मिळतील?'. जो ॲसेट खूप जास्त प्रमाणात लिक्विड असेल तो जणूकाही रोख पैशांप्रमाणेच असतो. लिक्विड म्युच्युअल फंडांमध्ये जोखीम घटक सर्वात कमी असतो आणि त्यातून मिळणारा परतावा किंवा उत्पन्न हे बचत खात्यापेक्षा जरासे जास्त असते. या फंडांद्वारे लवकर मुदत संपणाऱ्या डेट सेक्युरिटीजमध्ये गुंतवणूक केली जाते, त्यामुळे ही गुंतवणूक कमी जोखीमयुक्त असते.

### iv. हायब्रिड फंडस्

याच्या नावातून निर्देश केल्यानुसारच, हायब्रिड फंडस्मधील गुंतवणुकीत ॲसेट क्लासेसचे मिश्रण असते उदा. डेट आणि इक्विटी. म्हणजेच या फंडांद्वारे डेट, मनी मार्केट इंस्ट्रुमेंटस् आणि इक्विटी यांमध्ये गुंतवणूक केली जाते.

## ३. म्युच्युअल फंडांचे फायदे कोणकोणते आहेत?

### i. म्युच्युअल फंड लवचिक असतात

बहुतेक सर्व लोकांच्या बाबतीत पैसे मिळवण्याचे व खर्च करण्याचे मार्ग वेगवेगळे असतात त्यामुळेच गुंतवणुकींचे स्वरूप लवचिक असणे आवश्यक असते, ज्यामुळे तुम्हाला तुमच्याकडील परिस्थितीनुसार गुंतवणूक करता येईल. म्युच्युअल फंडांच्या अनेक वैशिष्ट्यांमुळे ते लवचिक स्वरूपाचे बनतात, उदा. गुंतवणुकीची किमान रक्कम, योजनांचे प्रकार, गुंतवणुकीची वारंवारता आणि पैसे काढून घेण्याचा पर्याय.

### ii. म्युच्युअल फंड लिक्विड असतात

ओपन एंडेड फंडांमध्ये , जेथे तुम्ही कामाच्या कोणत्याही दिवशी खरेदी किंवा विक्री करू शकता तेथे तुम्हाला तुमचे पैसे सामान्यत: ३ कार्यदिवसांच्या आत परत मिळू शकतात.

### iii. म्युच्युअल फंड पारदर्शक असतात आणि तुलनात्मक दृष्टीने सुरक्षित असतात.

जेव्हा तुम्ही तुमच्या बचतीची रक्कम दुसऱ्याच्या हातात देणार तेव्हा तुम्हाला अनिश्चितता जाणवणे किंवा सावधगिरी घ्यावीशी वाटणे स्वाभाविकच आहे. म्युच्युअल फंडांच्या बाबतीत, तुम्ही तुमचे पैसे एका व्यावसायिक व्यक्तीच्या हाती देत असतात, ज्याचे काम असते बाजारपेठेतील हालचालींवर लक्ष ठेवणे आणि तुमच्यासाठी सर्वात चांगल्या संधी कोणत्या ते शोधणे. इतकेच नव्हे तर, म्युच्युअल फंडस् एक मासिक फंडस शीट प्रसिद्ध करतात ज्यात तुम्ही ज्या योजनेत पैसे गुंतवलेले आहेत त्याबद्दलची सर्व महत्त्वाची माहिती दिलेली असते. शिवाय, दररोज एएमएफआयवर आणि फंड कंपनी वेबसाइटवर एनएव्ही प्रसिद्ध केला जातो, त्यामुळे तुम्हाला तुमच्या गुंतवणुकींबद्दल सतत माहिती मिळेल याबद्दल खात्री करून घेतली जाते.

### iv. म्युच्युअल फंडांमुळे तुम्हाला वेगवेगळ्या ठिकाणी गुंतवणूक करता येते

'सर्व अंडी एकाच बास्केटमध्ये ठेवू नये' या जुन्या म्हणीप्रमाणे तुमची गुंतवणूक अनेक ठिकाणी केल्यामुळे तुमची एकूण जोखीम कमी होण्यास मदत होईल. तुम्ही याआधी वाचल्याप्रमाणे, इक्विटी म्युच्युअल फंड वेगवेगळ्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये गुंतवणूक करतात तर डेट फंड सरकारी प्रतिभूती (सेक्युरिटी), एनसीडी, सीडी, सीपी बाँडस् आणि इतर निश्चित उत्पन्न देणाऱ्या प्रतिभूतींमध्ये गुंतवणूक करतात. अशा रीतीने एक गुंतवणूकदार म्हणून तुम्हाला विविध प्रकारे गुंतवणूक करता येते.

### v. म्युच्युअल फंड ट्रँझॅक्शन कॉस्ट कमी करतात.


जर कोणतीही गोष्ट एकदम मोठ्या प्रमाणात खरेदी केली तर अधिक चांगला सौदा करता येतो. होलसेलमध्ये खरेदी करण्याचा दर हा नेहमीच रीटेल दरांपेक्षा खूपच कमी असतो. मग हेच तत्त्व म्युच्युअल फंडांना लावून पाहिले तर काय दिसते? अनेक व्यक्तींनी त्यांच्या बचतीचे पैसे एकत्र केले तर तुम्हाला सौदा करण्याच्या ताकदीचा फायदा मिळतो, ज्यामुळे एकूण ट्रँझॅक्शन कॉस्ट कमी होते.

### vi. व्यावसायिक व्यवस्थापन

आपण आपले केस घरी कापतो का? याचे उत्तर अर्थातच 'नाही' असे आहे. आपण न्हाव्याकडे जातो कारण तो त्यात तज्ज्ञ असतो. त्याचप्रमाणे म्युच्युअल फंडांमध्ये तुमच्या पैशांचे व्यवस्थापन एका व्यावसायिक फंड मॅनेजरद्वारे केले जाईल, ज्याला फंडांच्या व्यवस्थापनाचा अनुभव असेलच व या अनुभवाला उत्तम संशोधन आणि बाजारपेठेतील हालचालींची समज यांचीही जोड असेल.

## ४. म्युच्युअल फंडांमध्ये पैशांची गुंतवणूक कशी करावी?

या प्रश्नाचे उत्तर तुमच्या उद्दिष्टांवर अवलंबून आहे. सर्वप्रथम तुम्ही तुमची उद्दिष्टे निश्चित केली पाहिजेत, त्यानंतर तुमच्या उद्दिष्टांनुसार व तुम्ही घेऊ इच्छित असलेल्या जोखमीनुसार तुम्ही म्युच्युअल फंड निवडू शकता व त्याचे मूल्यमापन करू शकता.





**म्युच्युअल फंडांतील गुंतवणुकी बाजारपेठेतील जोखमींच्या अधीन असतात, योजनेशी संबंधित सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा.**



आम्हाला ईमेल येथे पाठवा : customercare@miraeasset.com | संपर्क साधा : १८००-२०९०-७७७ (टोल फ्री) सोम-शुक्र सकाळी ९.३० ते संध्याकाळी ५.३० | इंटरनेट: www.miraeassetmf.co.in

**मिराइ ॲसेट ग्लोबल इन्वेस्टमेंटस (इंडिया) प्रा. लि.**

CIN - U65593MH2006FTC165663

युनिट क्र. ६०६, ६ वा मजला, विंडसर बिल्डिंग, ऑफ सी.एस.टी. रोड, कालिना, सांताक्रूझ- मुंबई- ४०० ०९८